# चित्ररूप गीतरामायण



● मुंबई टाइम्स टीम, ठाणे

डोंबिवलीचे ज्येष्ठ गायक वसंत आजगावकर यांच्या गीतरामायण गायनातील अवीट गोडीचा यंदा ठाणेकरांनी रसिकतेने आस्वाद घेत आहेत. श्री कौपिनेश्वर मंदिर ट्रस्टने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचा मंगळवारी रामनवमीला समारोप होत आहे.

वसंत आजगावकर यांच्या गायनाला यंदा ५० वर्षं पूर्ण होताहेत. हा एक अपूर्व योगायोग म्हणावा लागेल. ठाण्याचे श्री कौपिनेश्वर मंदिर शहराचं भूषण समजलं जातं. श्री. कौपिनेश्वर महाराज म्हणजे ठाण्याचे पुराण पुरुष समजले जातात. आजगावकर १९६२ पासून म्हणजे गेली ४५ वर्षं आपल्या गीतगायनाने या पुराण पुरुषासमोर आपली सेवा रुजू करत आहेत.

यंदा वसंत आजगावकर यांच्या संपूर्ण गीतरामायण कार्यक्रमात एक तरुण चित्रकार विक्रम घाग याने प्रत्येक गाणं ऐकत चित्र काढली. गाण ऐकत असताना मनात उमटलेल्या भावभावनांची रेषांशी केलेली गुंफण म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा आणि कुंचल्याच्या आविष्काराचा एक विक्रम म्हणावा लागेल. त्यांचं हे चित्ररूप गीतरामायण अत्यंत देखणं आणि आनंददायी झालेलं आहे. २७ मार्च रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर त्यांनी आपल्या कुंचल्यातून साकारलेलं चित्ररूप गीतरामायाण पाहाण्यासाठी सर्वांना खुलं केलं जाणार आहे.





छाया : अनिल शिंदे

विक्रमादित्य शंकरराव घाग, असं या तरुण चित्रकाराचे लांबलचक नाव असून ते कल्याण (पूर्व) विठ्ठलवाडी इथे राहतात. आर्थिक परिस्थितीमुळे चित्रकलेचं रीतसर शिक्षण घेता न आलेल्या या चित्रकाराने आपल्या वडिलांचा परंपरागत चित्रकलेचा वारसा जपून आपल्या प्रतिभेची त्यात भर घातली आहे.

मानवी भावभावनांचं प्रत्यक्ष दर्शन म्हणजे देहबोली! या देहबोलीचा वापर दृष्ट्यानुभव देण्यासाठी करावा म्हणून हीच देहबोली नेमक्या रेषांनी पकडण्याचा माझा प्रयत्न असतो त्यांनी नम्रपणे सांगितलं. रेखाकन साकारताना मला समजलेला विषय, त्याच चिंतन आणि आलेल्या अनुभवनातून मनात उमटलेलं भाव प्रकट होतात. प्रतिभेमुळे कवी काव्य करू शकतो. गायक गाऊ शकतो. त्याच शक्तीमुळे मी भावभावना रेषात मांडण्याचा प्रयत्न करत असतो, असे त्यांनी सांगितलं.



नाट्यगीत, भावगीत, दिवाळी पहाटसारख्या विविध कार्यक्रमांमध्ये या चित्रकाराने आपली रेखांकनं सादर केली आहेत. स्वा. सावरकर पुण्यतिथी निमित्ताने 'मजसी ने' कार्यक्रम आणि गाण्यात रंगला श्रीरंग कार्यक्रमात त्यांना सादर केलेली रेखांकनं गाजली.वसंत आजगावकर यांच्या गीतरामायण कार्यक्रमात सादर केलेली रेखांकनं हा एक उत्कृष्ट अनुभव होता. ती पाहून सर्वांचा अनुभव समृद्ध होईल.

mumbaitimes@indiatimes.com